लोकमत

# मुंबई, शिवाजी विद्यापीठाची आघाडी

## पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धा: आज समारोप, मराठवाडा विद्यापीठावर मात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पश्चिम विभागीय पुरुष कबड्डी स्पर्धेत गुरुवारी मुंबई विद्यापीठाने कोटा विद्यापीठाला, तर शिवाजी विद्यापीठाने औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला नमवून आघाडी घेतली. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या या संघांमध्ये मानांकनासाठी लढती सुरु झाल्या. आज, शुक्रवारी सकाळी ११ वाजता स्पर्धेचा समारोप होणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात कबड्डी स्पर्धा सुरु आहे. शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील दुसरी लढत चुरशीने झाली. या दोन्ही विद्यापीठांचे संघ एक वर्षानंतर अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. त्यांच्यात सामना चुरशीने झाला. त्यात वेगवान, आक्रमक चढाया करीत शिवाजी विद्यापीठाने गुणांची कमाई सुरु केली. त्याच्या तुलनेत औरंगाबाद विद्यापीठाकडून चांगल्या चढाया झाल्या. मात्र, बचावात हा संघ थोडा कमी पडला. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने औरंगाबाद विद्यापीठावर ३७-२५ गुणांनी विजय मिळविला. शिवाजी विद्यापीठाकडून अक्षय निकम, राहुल वडार, ह्षिकेश देसाई यांनी, तर औरंगाबाद विद्यापीठाच्या आकाश पिकलगुंडे, आकाश गव्हाणे, विशाल घनगाव यांनी उत्कृष्ट खेळ केला. या सामन्यासाठी शहाजान शेख, प्रदीप बनगे, राजेंद्र बनसोडे, दिलीप चव्हाण, ह्षिकेश लोहार, रमजान देसाई, अमोल सूर्यवंशी हे पंच होते. दरम्यान, सायंकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठाने कोटा विद्यापीठावर ३५-२५ अशा गुणांनी, तर मुंबई विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला ४२-४१ अशा गुणांनी निसटता विजय मिळविला. या विजयी दोन्ही संघांनी प्रत्येकी चार गुणांची कमाई केली.

### गुणांवर ठरणार मानांकन

या स्पर्धेत मुंबई, औरंगाबाद, कोटा आणि शिवाजी विद्यापीठांत साखळी सामने होतील. त्यांत मिळणाऱ्या गुणांच्या आधारावर या संघाचे राष्ट्रीय स्पर्धेसाठीचे मानांकन ठरणार आहे. या संघांना या वर्षी कोल्हापूर जिल्हा कबड्डी संघटनेतर्फे चषक देऊन सन्मानित केले जाणार असल्याचे संघटनेचे सदस्य बाबासाहेब उलपे यांनी सांगितले.



कोल्हापुरात गुरुवारी पश्चिम विभागीय पुरुष कबड्डी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ आणि औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात चुरशीने सामना झाला.

30 NOV 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबईसह शिवाजी विद्यापीठाचे वर्चस्व

**पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा : साखळीफेरीतील सामने : आज स्पर्धेचा समारोप, बक्षीस समारंभ**



ोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत गुरुवारी झालेल्या यजमान िवाजी विद्यापीठ विरुद्ध औरंगाबाद विद्यापीठ यांच्यातील लढतीचा एक क्षण.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेतील साखळी सामन्यांना गुरुवारी प्रारंभ झाला. यजमान शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठाने विजयी घौडदौड कायम राखली. साखळी फेरीतील पहिल्या दिवशीच्या दोन सामन्यात प्रतिस्पर्धी संघांवर विजय मिळवून प्रत्येकी ४ गुणांसह गुणतक्त्यात आघाडी मिळवून वर्चस्व निर्माण केले.

यजमान शिवाजी विद्यापीठ विरुद्ध कोटा विद्यापीठ यांच्यात गुरुवारी सायंकाळच्या सत्रात रंगतदार सामना झाला. कोटा विद्यापीठ संघाने एकेका गुणासाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघाला झुंजविले. मात्र, शिवाजी विद्यापीठाने अखेरपर्यंत गुणांची आघाडी कायम राखत सामना ३५–२५ गुणांनी जिंकला. यानंतर दुसरा सामना मुंबई विद्यापीठ विरुद्ध औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झाला. सामन्याच्या शेवटच्या मिनिटापर्यंत एक–दोन गुणांचा फरक होत राहिला. अखेरच्या क्षणी मुंबई विद्यापीठाने सामना ४२–४१ असा अवघ्या एका गुणाने जिंकला.

तत्पूर्वी, गुरुवारी सकाळच्या सत्रात यजमान शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ संघाने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करीत प्रत्येकी दोन गुणांची कमाई केली. यजमान शिवाजी विद्यापीठ विरुद्ध औरंगाबादचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यातील सामना अत्यंत चुरशीचा झाला. पहिल्या गुणापासून दहाव्या गुणांपर्यंत सामना बरोबरीत राहिला. यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या संघाने आक्रमक पवित्रा घेत वेगवान चाली रचून गुणांची आघाडी घेतली. अन् मराठवाडा विद्यापीठावर ३७–२५ गुणांनी विजय संपादन केला.

दुसरा सामना मुंबई विद्यापीठ विरुद्ध कोटा विद्यापीठ यांच्यात झाला. चुरशीच्या झालेल्या सामन्यात मुंबई विद्यापीठाने कोटा विद्यापीठावर आघाडी घेतली. मुंबई विद्यापीठाच्या आक्रमणापुढे कोटा

### आजचे सामने

**सकाळच्या सत्रात**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद विरुद्ध कोटा विद्यापीठ, कोटा

२) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विरुद्ध मुंबई विद्यापीठ, मुंबई

३) अखेरच्या सामन्यांनंतर त्वरित कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार प्रदान समारंभ

विद्यापीठाचा संघ निष्प्रभ ठरला. मुंबईच्या खेळाडूंनी त्यांच्यावर दबाव कायम राखत सामन्यात ४१–२५ गुणांनी मात केलेली आहे.

जनसंपर्क कक्ष
30 NOV 2018 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुवर्ण 'कीर्ती'



कोल्हापूर : मंगळूर विद्यापीठ (मोडबीद्री) येथे झालेल्या अखिल भारतीय थाळीफेक स्पर्धेत चंदगड येथील र. भा. माडखोलकर महाविद्यालयाचा खेळाडू कीर्तीकुमार बेनके याने (५३. ५९ मी. ) सुवर्णपदक प्राप्त केले. त्याचे अभिनंदन करताना शिवाजी विद्यापीठ कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सोबत डॉ. पी. टी. गायकवाड. त्याला कोवाडच्या कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्रशिक्षक प्रा. आर. टी. पाटील, कडेगाव येथील कन्या महाविद्यालयाच्या संघ व्यवस्थापक शिफा मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# शिवाजी, मुंबई विद्यापीठाचे साखळी फेरीत वर्चस्व

## स्पर्धेचा आज समारोप



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे खेळाडू प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूची पकड करताना.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेतील साखळी सामने गुरुवारी प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात रंगले. यजमान शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ या संघांनी आपली विजयी घोडदौड कायम राखत प्रत्येकी दोन सामने जिंकत प्रत्येकी ४ गुणांसह गुणांकनात आघाडी मिळविली. या स्पर्धेचा शुक्रवारी समारोप होणार आहे.

सायंकाळी शिवाजी विद्यापीठाचा कोटा विद्यापीठासमवेतचा सामना अत्यंत चुरशीने रंगला. मात्र, शिवाजी विद्यापीठाने अखेरपर्यंत गुणांची आघाडी कायम राखली आणि सामना ३५-२५ असा जिंकला. या सत्रात दुसरा सामना मुंबई विद्यापीठ आणि औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झाला. अखेरपर्यंत दोन्ही संघांनी आपापल्या विजयाची शक्यता जिवंत राखली. मात्र, अखेरच्या क्षणी मुंबई विद्यापीठाने सामना ४२-४१ असा अवघ्या एका गुणाने जिंकला. तत्पूर्वी, गुरुवारी सकाळी यजमान शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठाने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करीत प्रत्येकी दोन गुणांची कमाई केली. यजमान शिवाजी विद्यापीठ आणि औरंगाबादचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यातील सामना पहिल्या गुणापासून दहाव्या गुणांपर्यंत बरोबरीत रंगला. मात्र, उत्तम सांघिक खेळाच्या जोरावर हा सामना शिवाजी विद्यापीठाने ३७-२५ असा जिंकला. मुंबई विद्यापीठाचा सामना कोटा विद्यापीठाशी झाला. हा सामनाही अत्यंत रंगतदार झाला. मुंबईच्या खेळाडूंनी त्यांच्यावर दबाव कायम राखण्यात यश मिळविले आणि सामना ४१-२५ असा जिंकला.